खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### राज्यशास्त्र विभाग : पोलीस निरीक्षक विजयसिंह चव्हाण

लोकमत

### शिक्षणाचा स्तर उंचावण्याची गरज : विजयसिंह चव्हाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** समाजातील बेरोजगारी, भूकबळी, जातियता, वंशभेद आणि आर्थिक असमानता दूर करायची असेल, तर शिक्षणाचा स्तर कमालीचा उंचावण्याची गरज असल्याचे प्रतिपादन खेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विजयसिंह चव्हाण यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात युवतींचे सबलीकरण आणि समाज या विषयावर ते बोलत होते.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, डॉ. कैलास सोनवणे उपस्थित होते. युवतींचे सबलीकरण होण्यासाठी प्रभावी शिक्षण आवश्यक असून महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी भौतिक व क्षणिक मोहाला बळी न पडता शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे. विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपताना सर्वार्थाने देश मोठा करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना सामूहिक अध्ययन पद्धतीचा वापर करावा. चालू घडामोडींच्या नोंदी कराव्यात. नियमित वर्तमानपत्रांचे वाचन करावे. यशस्वी व अयशस्वी व्यक्तींचे मार्गदर्शन घ्यावे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कैलास सोनवणे यांनी, सूत्रसंचालन प्रा. संदीप देशमुख यांनी तर आभार डॉ. प्रभाकर जगताप यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 6 Nov 12, 2022
Powered by: erelego.com

HRM

दैनिक संध्या

# शिक्षणाचा स्तर उंचावण्याची गरज

## विजयसिंह चव्हाण

**राजगुरूनगर (दै. संध्या) :**

समाजातील बेरोजगारी, भूकबळी, जातीयता, वंशभेद, आणि आर्थिक असमानता दूर करायची असेल, तर शिक्षणाचा स्तर कमालीचा उंचावण्याची गरज असल्याचे प्रतिपादन खेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विजयसिंह चौहान यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात युवतींचे सबलीकरण आणि समाज या विषयावर ते बोलत होते.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, डॉ. कैलास सोनवणे उपस्थित होते.

युवतींचे सबलीकरण होण्यासाठी प्रभावी शिक्षण आवश्यक असून महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी भौतिक व क्षणिक मोहाला बळी न पडता शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे. विद्यार्थ्यांनी



सामाजिक बांधिलकी जपताना सर्वार्थाने देश मोठा करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना सामूहिक अध्ययन पद्धतीचा वापर करावा. चालू घडामोडींच्या नोंदी करव्यात. नियमित वर्तमानपत्रांचे वाचन करावे. यशस्वी व अयशस्वी व्यक्तींचे मार्गदर्शन घ्यावे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कैलास सोनवणे यांनी, सूत्रसंचालन प्रा. संदीप देशमुख यांनी तर आभार डॉ. प्रभाकर जगताप यांनी मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**